आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in





# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक १३९ वा ● शनिवार दि. २६ ऑक्टोबर २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●


## महाराष्ट्राची हास्यजत्रा फेम पृथ्वीक प्रतापने केले प्राजक्ताशी लग्न!

मुंबई:अतरंगी भूमिकेमुळे लाखो चाहत्यांच्या मनात स्थान निर्माण केलेल्या पृथ्वीक प्रतापने आनंदाची बातमी दिली आहे. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'फेम अभिनेता पृथ्वीक प्रताप लग्नबंधनात अडकल्याचे समोर आले आहे. लग्नाची कोणतीही माहिती न देता थेट लग्नाचे फोटो शेअर करत पृथ्वीकने सर्व चाहत्यांना सुखद धक्का दिला आहे.प्राजक्ता वायकुळ असे पृथ्वीकच्या पत्नीचे नाव असून यांनी आज साधेपणाने लग्न केलं आहे. हे दोघे एकमेकांना डेट करत असून आता त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. पृथ्वीकने गुपचूप लग्न उरकल्यामुळे सगळेच आश्चर्य झाले आहेत.

''२५-१०-२०२४. एक नवी सुरुवात व्हावी या ही बंधनाने, साक्षीदार व्हावं मग मोगऱ्याच्या ही सुगंधाने!'', असं कॅप्शन देत पृथ्वीकने सोशल मीडियावर फोटो शेअर केले आहेत. या फोटोवर चाहते आणि कलाकारांकडून कौतुकाचा वर्षाव केला जात आहे.

# देशमूख, निलंगेकरामुळे राजकीय सारीपाटात बदल होणार ?

विधानसभा निवडणूक - २०२४



लातूर : मराठवाड्यातील सत्ताकारणात बदल होत असताना महायुती आणि महाविकास आघाडीतील नेत्यानी जाणीवपूर्वक बदल केल्यामूळे परस्पर विरोधी पक्ष नेत्यानी देशमूख, निलंगेकरांना समोर ठेवून सत्तेचे बेरजीकरण केल्यामूळे धर्मनिरपेक्ष पुरोगामी विचाराच्या लातूर जिल्ह्यातील राजकारणाला वेगळे वळण लागते की काय, अशीच कुजबूज सर्वत्र होताना दिसते आहे.

लातूर जिल्ह्यातील विधानसभा मतदार संघाचा आढावा घेतला असता, लक्षात असे येते की, अहमदपूर, उदगीर, निलंगा, लातूर अशा विधानसभा मतदार संघातील उमेदवारांची चाचपणी केली असता, मराठा समाजाचे वर्चस्व अधिक जाणवते. भाजपा आणि कॉंग्रेसला राजकीय वळण अधिक असले तरी औसा वगळता उदगीर जळकोट मतदार संघात बौध्द विरुध्द मांतग असा सामना स्पष्ट दिसल्यामूळे शरद पवारांच्या कुटनितीकडे लक्ष केंद्रीत होते. लातूर विधानसभा मतदार संघा मध्ये अमित देशमूख यांना पुढे करुन औशा मध्ये पवारानां साथ द्यायची आणि उदगीर मध्ये संजय बनसोडे यांना ठोकरायचे ही कुटनिती ठाकरे, पवार, आणि कॉग्रेसच्या थोरांताची शक्कल असावी की काय, अशीच राजकीय वर्तूळात कुजबूज होताना दिसते आहे. कारण असे की, उदगीरच्या इतिहासा मध्ये शरद पवार यांचे अधिक लक्ष आहे आणि होते. औशाच्या मतदार संघातून किशनराव जाधवाच्या काळापासून उदगीरच्या तोंडचिरका पर्यंत शरद पवाराचे लक्ष लागूण राहीले होते, जातीय समीकरणाच्या बेरजेतून शरद पवार यांनी संजय बनसोडे यांना उभा केले. परंतू ते अजित पवार गटा मध्ये गेल्यामूळे शरद पवार यांनी सुधाकर भालेराव यांचा पर्याय समोर केला. आणि काट्याने काटा कसा काढावा हे सुत्र जमवीले, त्यामूळे निलंगेकर, देशमूख यांच्या नावावरुन राजकीय खेळी खेळून आपापला मनसुबा शरद पवार यांनी आखला असावा अशीच राजकीय वर्तूळात प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे.

विशेष म्हणजे शरद पवार यांना मराठवाड्यातील लातूरसाठी कांही देणे, घेणे नसले तरी, दगाफटकाच्या राजकारणातून संजय बनसोडे यांनी जी टांग मारली त्याचा वचपा काढण्यासाठी आणि अजित पवार यांना त्यांची जागा दाखवून देण्यासाठी शरद पवार यांनी थोरात, ठाकरे यांच्या माध्यमातून देशमूख, निलंगेकर यांना बळ देवून उदगीर, जळकोट मतदार संघातील राजकारणाला शह देण्यासाठी शरद पवार यांची रणनिती महत्वाची ठरते अशीच कुजबूज प्रसार माध्यमातून होताना दिसते आहे.

## वैंशालीताई देशमुख यांनी साधला महिलांशी संवाद

लातूर (प्रतिनीधी) : विकासरत्न



विलासराव देशमुख यांनी दाखविलेल्या विकासाच्या वाटेवरुन मार्गाक्रमण करीत असलेले लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे आमदार माजी मंत्री अमित देशमुख आणि लातूर ग्रामीणचे आमदार धिरज देशमुख यांनी प्रामाणिकपणे लातूर शहर व लातूर ग्रामीणचा सर्वांगीण विकास केला आहे. विकासाची ही घोडदौड कायम ठेवण्यासाठी तमाम मतदारांनी पुन्हा एकदा काँग्रेस महाविकास आघाडीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहूण माजी मंत्री आमदार अमित देशमुख, आमदार धिरज देशमुख यांचे हात बळकट करावे, असे आवाहन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन सौ. वैशालीताई विलासराव देशमुख यांनी केले.

यावेळी रीड लातूरच्या संस्थापिका सौ. दीपशिखा धिरज देशमुख, सुनिताताई अरळीकर, शितलताई फुटाणे, कलावतीताई कदम, सुप्रभात पाटील, माधुरीताई कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना श्रीमती वैशालीताई देशमुख म्हणाल्या, मागील दहा वर्षात भाजपा महायुती सरकारने खोटी आश्र्वासने देत जनतेची फसवणूक केली आहे. विदेशातील काळा पैसा आपल्या देशात आणून शेतकरी, कष्टकरी, गोरगरीब यांच्या खात्यावर पंधरा लाख रुपये देऊन, असे आश्र्वासन दिले होते. त्यानंतर त्यांनी दुसजया पाच वर्षात सुशिक्षीतांना दोन कोटी नोकजया देण्याचे सांगितले होते. मात्र, त्यांनी दहा वर्षात त्यांना नोकरी दिली नाही. एवढेच नव्हे तर महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला हलवले. आपल्या युवक, युवतींना बेरोजगार बनवले. त्यामुळे आता सर्व मतदार बंधू-भगिनींनी महायुती सरकारच्या आश्र्वासनाला बळी न पडता आपल्या अडीअडचणी जाणून घेणाजया, आपल्या सुख-दु:खात सामील असणाजया काँग्रेस महाविकास आघाडीला खंबीरपणे साथ देत आपल्याला अमित देशमुख व धिरज देशमुख यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, असे आवाहन केले.

रीड लातूरचा संस्थापिका सौ. दीपशिखा धिरज देशमुख म्हणाले, पाच वर्षांपूर्वी आपण दिलेल्या आशीर्वादाने आमदार धिरज देशमुख यांनी सर्वसामान्य जनतेचे प्रश्न्न प्रामाणिकपणे सोडवले. यंदाही आमदार धिरज देशमुख यांना मोठ्या मताधिक्क्यांनी विजयी करावे, असे आवाहन केले.

यावेळी सीमा थोरात, मनीषा देवकते, अज्ञानबाई चिकाटे, दिलशाद पठाण, सुमनबाई शिंदे, झुंबरबाई शिंदे, मनीषा माने, सुनीता दळवे, शिल्पा थोरात, शारदा स्वामी, मधुबाला होळे, लक्ष्मी गवळी, लक्ष्मी शिंदे, कमलताई शिंदे, सुमनताई शिंदे, गयाबाई घोडके, राजश्रीताई शिंदे, निर्मलाताई गरड, बबीता बेले, सुनीता बेले, गीतांजली शिंदे, ज्योती शिंदे, निर्मला गरड, लक्ष्मी गरड, रत्नाताई शिंदे, बबीता बेले, सरोजा गरड, पुजा वाघमारे, शिवकांता वागळे, सीमाबाई जाधव, बालिका जाधव, सुमित्रा वाकडे, महादेवी कांबळे, विटाबाई लोंढे, रेणुका दाभाडे, शोभा कांबळे, मुमताज शेख, संगीता कांबळ, मनीषा बकडे, छकुला कांबळे, जनाबाई जाधव, मंदाबाई कांबळे, जुबेदाबी शेख, बानु शेख, सागरबाई जाधव, सीता जाधव आदीसह महिला व काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते व गावकरी मंडळ उपस्थित होते.




## मतदारजागृतीसाठी 'कॉफी विथ कलेक्टर' उपक्रम जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांचा नवमतदारांशी संवाद





लातूर : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. लातूर जिल्ह्यातील सहाही मतदारसंघात मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी जिल्ह्यात 'स्वीप' उपक्रमांतर्गत मतदार जागृती अभियान राबविण्यात येत आहे. या अंतर्गत लातूर येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात 'कॉफी विथ कलेक्टर' उपक्रम आयोजित करण्यात होता. यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी युवा मतदारांशी संवाद साधून आगामी विधानसभा निवडणुकीत सर्वांनी मतदान करण्याचे आवाहन केले.

माध्यमिकचे शिक्षणाधिकारी तथा स्वीपचे नोडल अधिकारी नागेश मापारी, योजना शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिध्देश्र्वर बल्लाळे, डॉ. दिलीप नागरगोजे, डॉ. संध्या वाडीकर, प्रा. विलास कोमटवाड, डॉ. संदीपान जगदाळे आदी यावेळी उपस्थित होते.

निवडणुका हा लोकशाहीचा उत्सव आहे आणि मत हा लोकशाहीसर्वात सर्वात महत्त्वाचा अधिकार आहे. त्यामुळे प्रत्येक युवा मतदाराने आपला मतदानाचा अधिकार बजवावा. यासोबतच आपल्या कुटुंबातील आणि मित्र परिवारातील प्रत्येक मतदाराला २० नोव्हेंबर २०२४ रोजी विधानसभा निवडणुकीसाठी मतदानासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी यावेळी केले. प्रत्येक मत हे मौल्यवान असून आपल्याला मिळालेल्या या अधिकाराचे मोल लक्षात घेवून नवमतदार, वयोवृद्ध नागरिक, महिला यांनी मतदान करावे, असे त्या यावेळी म्हणाल्या.

युवकांशी मनमोकळा संवाद आणि निवडणूक प्रक्रीयेबाबत प्रश्नोत्तरे 'कॉफी विथ कलेक्टर' कार्यक्रमात जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी युवक-युवतींशी मनमोकळा संवाद साधत त्यांना लोकशाही आणि निवडणूक प्रक्रियेतील प्रत्येक मतदाराचे महत्व याबाबत माहिती दिली. तसेच निवडणूक प्रक्रिया, लोकशाही व्यवस्था याबाबत प्रश्नोत्तराच्या माध्यमातून विविध बाबींवर प्रकाश टाकला. यामध्ये युवक-युवतींनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवून विविध प्रश्नांची उत्तरे दिली. तसेच लोकशाही आणि निवडणुकीबाबत आपले मत व्यक्त केले.

प्रारंभी उपस्थित सर्वांना मतदार जागृतीची शपथ देण्यात आली. तसेच डॉ. संदीपान जगदाळे यांनी मतदानाचे महत्व सांगणारा पोवाडा सादर केला.

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपाच्या १२ उमेदवारांचे अर्ज दाखल

मुंबई : राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी



नागपूर दक्षिण पश्र्चिम विधानसभा मतदारसंघातून विधानसभेचा उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यावेळी त्यांच्यासोबत ज्येष्ठ नेते व केंद्रीय रस्ते बांधणी मंत्री नितीन गडकरी,भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. दिवसभरात भाजपाच्या एकूण १२ उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले.

मुंबई भाजपाचे अध्यक्ष ड. आशीष शेलार यांनी अर्ज दाखल करण्यापूर्वी सिद्धिविनायक मंदिरात जाऊन दर्शन घेतले. यावेळी त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी ड. प्रतिमा शेलार उपस्थित होत्या. विधानसभा अध्यक्ष आमदार राहुल नार्वेकर यांनी कुलाबा मतदारसंघातून अर्ज दाखल केला.यावेळी त्यांच्यासोबत महाराष्ट्र विधानसभा निवडणूक प्रभारी भूपेंद्र यादव,ज्येष्ठ नेते व माजी आ.राज पुरोहित उपस्थित होते.

त्याचबरोबर नालासोपारा येथून राजन नाईक तर अकोला पूर्व येथून भाजपा प्रदेश सरचिटणीस रणधीर सावरकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. हरिष पिंपळे, वसंत खंडेलवाल, विप्लव बाजोरिया आदि मान्यवर तसेच कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

रावेरमधून अमोल जावळे,अचलपूरमधन प्रविण तायडे,देवळी येथून राजेश बकाने, संभाजीनगर येथून विद्यमान गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी अर्ज दाखल केला. त्यांच्या समवेत खा.डॉ.भागवत कराड उपस्थित होते. दौंड येथून राहुल कुल, कर्जत जामखेड येथून प्रा. राम शिंदे, औसा येथून अभिमन्यू पवार यांनी आपले अर्ज दाखल केले.

## आमदार झिशान सिद्दिकी यांचा अजित पवार गटात प्रवेश!

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते बाबा सिद्दिकी यांचे पुत्र आमदार झिशान सिद्दिकी यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. राष्ट्रवादीने झिशान सिद्दिकी यांना वांद्रे पूर्व येथून उमेदवारी दिली आहे.



अजित पवार यांच्याकडून यशस्वी कारकिर्दीसाठी शुभेच्छा

'आपल्या वडिलांचा लोकसेवेचा, समाजसेवेचा वारसा झिशान हे नेटानं पुढे नेतील, असा विश्वास आहे. मी त्यांचं मनापासून स्वागत करतो आणि पुढील यशस्वी कारकिर्दीसाठी शुभेच्छा देतो.'' असे अजित पवार यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत म्हटले आहे.

'कठिण काळात अजित पवार, सुनिल तटकरे माझ्यामागे उभे राहिलेत. त्यांनी मला मदत केली . रेकॉर्डब्रेक मतांनी मी विजयी होईल. कांग्रेसने ढोंगीपणा केला आणि तो आता जनतेच्या समोर आला आहे. असे त्यांनी म्हटले.

# भोकर विधानसभेत भाजप- काँग्रेस-वंचित मध्ये होणार तिरंगी लढत

भोकर / सिद्धार्थ जाधव/ राज्यातील विधानसभेची घोषणा झाल्यानंतर राज्यात सर्व विधानसभेसाठी २० नोव्हेंबर रोजी एकाच टप्प्यात मतदान होणार असून २३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होणार आहे.

भोकर विधानसभा मतदारसंघासाठी भाजपकडून आपल्या पहिल्या यादीत २० सप्टेंबर रोजी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांची कन्या श्रीजया चव्हाण तर वंचित कडून दिनांक १९ रोजी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड.प्रकाश आंबेडकर यांच्याकडून जाहीर केलेल्या चौथ्या यादीत रमेश राठोड यांची अधिकृत उमेदवारीची घोषणा करण्यात आली आहे. तर काँग्रेसने घोषित केलेल्या आपल्या पहिल्या यादीमध्ये भोकर विधानसभा मतदारसंघासाठी तिरुपती उर्फ पप्पू कोंढेकर यांची उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. भाजप-काँग्रेस आणि वंचित या तीन पक्षाच्या उमेदवारांच्या रूपाने भोकर विधानसभा मतदारसंघात खरी तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे.

होऊ घातलेल्या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांची कन्या श्रीजया चव्हाण यांची भाजपकडून उमेदवारी घोषित झाल्याने संबंध महाराष्ट्राचे लक्ष भोकर विधानसभा मतदारसंघाकडे लागले असून भोकर मतदार संघात बहुसंख्य ओबीसी समाजाचे मतदार असल्याने दिनांक १९ ऑक्टोबर रोजी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांच्याकडून जाहीर केलेल्या चौथ्या यादीत राज्यातील एकूण १६ मतदार संघासाठी उमेदवार जाहीर झाले असून यामध्ये ओबीसी प्रवर्गातील







बंजारा समाजाचे रमेश राठोड यांची घोषणा करून मतदार संघातील ओबीसी न्याय देण्याच्या प्रयत्न केला तर भोकर विधानसभा मतदारसंघ हा काँग्रेसचा बालेकिल्ला राहिला असला असल्याने काँग्रेसने जाहीर केलेल्या पहिल्या यादीत काँग्रेसचे निष्ठावंत असलेले पप्पू कोंढेकर यांना भोकर विधानसभा मतदार संघात उमेदवारी दिली.

महायुतीकडून भाजपच्या वतीने नव्यानेच राजकारणात उतरलेल्या मा. मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांची कन्या आपला विकासाचा वारसा सोबत घेऊन विधानसभेच्या मैदानात उतरले असल्याने येथील मतदार विकासाचा वारसा पुढे नेण्यासाठी कमळ हाती घेतील काय...? भोकर मतदार संघ हा काँग्रेसचा बालेकिल्ला असल्याने येथील मतदार काँग्रेसने दिलेल्या निष्ठावंत कार्यकर्ता निष्प्पू कोंढेकर च्या रुपाने हा काँग्रेसचा बालेकिल्ला सभेत ठेवतील काय...? की मतदारसंघात बहुसंख्य असलेल्या ओबीसी समाज समाजाला प्रतिनिधित्व देऊन बाळासाहेब आंबेडकरांनी वंचित बहुजन आघाडी कडून दिलेले बंजारा समाजाचे रमेश राठोड यांच्या रूपाने ओबीसी उमेदवार रिंगणात उतरल्याने मतदार वंचिताला संधी देतील काय ...? या सर्व प्रश्र्नांची उत्तरे येणारा काळच देणार असून महायुतीच्या वतीने भाजपकडून आलेल्या अधिकृत उमेदवार श्रीजया चव्हाण, महाविकास आघाडी कडून आलेले काँग्रेसचे अधिकृत तिरुपती उर्फ पप्पू कोंढेकर व स्वबळावर लढणाऱ्या वंचित बहुजन आघाडी पक्षाच्या वतीने देण्यात आलेले अधिकृत उमेदवार रमेश राठोड या तिघांमध्ये खरी तिरंगी व अटीतटीची लढत पहावयास मिळणार आहे.

२०२४ विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये ८५-भोकर विधानसभा मतदारसंघातून मतदार एकाला संधी देणार आहेत यामुळे या तिन उमेदवाराच्या रूपाने एक नवीन चेहरा विधानसभेत निवडून जाणार असून भोकर विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारा हा चेहरा कोण असेल याकडे सबंध जिल्ह्याचे या मतदारसंघाकडे लक्ष लागून आहे.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# राजकीय जाहिरातींवर असणार 'एमसीएमसी' चा वॉच

सांगली जिल्ह्यात आठ विधानसभा मतदार संघात दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये प्रसारित होणाऱ्या राजकीय जाहिरातींचे प्रमाणिकरण माध्यम प्रमाणिकरण आणि संनियंत्रण समितीकडून करून घेणे बंधनकारक आहे. अशा राजकीय जाहिरातींचे प्रमाणिकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी केले आहे. याबाबत अधिक माहिती देणारा लेखष्ठ

माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समिती (एमसीएमसी) –

सर्वोच्च न्यायालयाने दि. १३ एप्रिल २००४ रोजी दूरचित्रवाणी आणि केबल वाहिनीवरील राजकीय स्वरूपाच्या जाहिरातींबाबत दिलेल्या निर्णयात अशा जाहिरातींचे पूर्वप्रमाणिकरण करण्यात यावे असे नमूद केले आहे. त्यासाठी समिती स्थापन करण्याचेही निर्देश दिले आहेत. त्यास अनुसरून मा. भारत निवडणूक आयोगाने दिनांक १५ एप्रिल, २००४ रोजीच्या पत्राने पूर्वप्रमाणिकरणाच्या अनुषंगाने समित्या स्थापन करावयाचे आदेश दिले आहेत. त्यात वेळोवेळीच्या सूचनांद्वारे अन्य इलेक्ट्रॉनिक माध्यमांची भर पडली आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या दिनांक २४ ऑगस्ट, २०२३ च्या पत्रान्वये माध्यम प्रमाणिकरण आणि संनियंत्रण समितीची (एमसीएमसी) रचना, जाहिरातींचे पूर्वप्रमाणिकरण तसेच पेड न्यूजबाबत यापूर्वीची सूचना, पत्रे, आदेश एकत्रित करून सर्वकष निर्देश जारी केले आहेत. त्यामध्ये एमसीएमसीची पुढीलप्रमाणे महत्त्वाची कामे नमूद करण्यात आली आहेत. त्यामध्ये राजकीय जाहिरातींचे प्रमाणिकरण, पेड न्यूज संबंधित कामकाज, निवडणूक खर्चाच्या दृष्टीकोनातून जाहिरातींकडे लक्ष ठेवणे यांचा समावेश आहे.

प्रत्येक नोंदणीकृतअनोंदणीकृत राष्ट्रीयराज्यस्तरीय राजकीय पक्ष निवडणूक लढविणारा उमेदवारअन्य व्यक्ती यांनी इलेक्ट्रॉनिक माध्यमात प्रसारित करावयाची राजकीय स्वरूपाची जाहिरात जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणिकरण आणि संनियंत्रण समितीकडून पूर्वप्रमाणित करून घेणे बंधनकारक आहे. हा आदेश केवळ निवडणूक कालावधीपुरता मर्यादित नसून, इलेक्ट्रॉनिक माध्यमात प्रसारित करावयाच्या राजकीय जाहिरातींसाठी वर्षभर लागू आहे.

कोणत्या जाहिरातींचे पूर्वप्रमाणिकरण आवश्यक ?

१) टीव्ही, केबल नेटवर्क केबल वाहिन्या, सिनेमा हॉल, आकाशवाणी, सार्वजनिक तसेच खासगी एफएम चॅनेल्स, सार्वजनिक ठिकाणी दाखविण्याच्या दृक–श्राव्य जाहिराती, ई–वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती, बल्क एसएमएस, रेकॉर्ड केलेले व्हाईस मेसेजेस, सोशल मीडिया, इंटरनेट संकेतस्थळे इ.वर टेलिकास्टब्रॉडकास्ट करावयाच्या प्रस्तावित राजकीय जाहिराती एमसीएमसी समितीकडून प्रमाणित करून घेणे.

२) तसेच मतदानाच्या (दि. २० नोव्हेंबर २०२४) आणि मतदानाच्या एक दिवस आधी (दि. १९ नोव्हेंबर २०२४) रोजी वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातींचेही समितीकडून पूर्वप्रमाणिकरण करणे बंधनकारक आहे.

अर्ज कोठे करावा ?

जिल्हा माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समिती, माध्यम कक्ष, जिल्हा माहिती कार्यालय, तळमजला, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सांगली, वेळ – कार्यालयीन वेळेत.

अर्ज सादर करण्यासाठी कालावधी इलेक्ट्रॉनिक माध्यमातील जाहिराती

१) नोंदणीकृत राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय राजकीय पक्ष किंवा निवडणूक लढविणारा उमेदवार किंवा प्रतिनिधी यांच्याकडून जाहिरात प्रसारित करण्याच्या दिनांकाआधी अर्ज किमान तीन दिवस आधी सादर करणे अपेक्षित.

२) स्वतंत्र व्यक्ती किंवा अनोंदित राजकीय पक्ष यांच्यासाठी किमान सात दिवस आधी अर्ज सादर करणे अपेक्षित.

इलेक्ट्रॉनिक माध्यमातील जाहिरातींसाठी चेकलिस्ट

१) विहित नमुन्यातील अर्ज (ॲनेक्झर ए).

२) इलेक्ट्रॉनिक स्वरूपात (पेन ड्राईव्ह, सीडी इ.) प्रस्तावित जाहिरातीच्या दोन स्वसाक्षांकित प्रती व प्रस्तावित जाहिरातीची स्वसाक्षांकित संहिता.

३) जाहिरातीच्या निर्मितीचा खर्च व प्रसारणाचा खर्च.

मुद्रित माध्यमातील जाहिराती (केवळ दि. १९ व २० नोव्हेंबर २०२४ रोजीच्या जाहिराती)

मा. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार वृत्तपत्रात मतदानाच्या (दि. २० नोव्हेंबर २०२४) आणि मतदानाच्या एक दिवस आधी (दि. १९ नोव्हेंबर २०२४) प्रकाशित होणाऱ्या जाहिरातीही प्रमाणित करून घेणे बंधनकारक आहे. त्यासाठी नोंदणीकृत राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय राजकीय पक्ष किंवा निवडणूक लढविणारा उमेदवारसंस्थाव्यक्ती यांच्याकडून जाहिरात प्रसिद्ध करण्याच्या दिनांकाआधी अर्ज किमान दोन दिवस सादर करावयाचा आहे.

समितीने सूचविलेले संहितेतील बदल किंवा संहितेतील आक्षेपार्ह भाग वगळणेफेरफार आदिंबाबतच्या सूचनांची अंमलबजावणी करणे संबंधितास बंधनकारक असून, समितीकडून तसा पत्रव्यवहार झाल्यानंतर संबंधित राजकीय पक्षउमेदवारस्वतंत्र व्यक्ती यांनी अपेक्षित कार्यवाही करून २४ तासात फेरअर्ज सादर करणे आवश्यक आहे.

सोशल मीडिया हे असे माध्यम आहे, ज्यात लोक आपल्या कल्पना, माहिती, मते यांची सोशल मीडियाच्या आभासी समुदायामध्ये (व्हर्च्युअल कम्युनिटी) एकमेकांबरोबर देवाणघेवाण करतात. गेल्या काही वर्षात सोशल मीडियाचा वापर वाढला असून निवडणूक काळात राजकीय आणि सामाजिक गटांमधून प्रचार प्रसिद्धीसाठी सोशल मीडियाची मागणी वाढत आहे.

निवडणूक मोहिमेशी संबंधित असलेल्या कायदेशीर तरतुदी, या इतर कोणत्याही प्रसार माध्यमाचा वापर करणाऱ्या निवडणूक मोहिमेच्या कोणत्याही इतर स्वरुपाला ज्या पध्दतीने लागू होतात त्याच पध्दतीने सोशल मीडियालाही लागू होतात. त्यामुळे सोशल मीडियावरील जाहिरातींचेही पूर्वप्रमाणिकरण बंधनकारक आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार उमेदवार व राजकीय पक्ष यांच्या खर्चाच्या विवरणपत्रात सामाजिक प्रसार माध्यमावरील जाहिरातींवर झालेल्या खर्चाचा देखील समावेश आहे. इतर बाबींसहित यामध्ये जाहिरात प्रसिध्दी करण्यासाठी इंटरनेट कंपन्या व वेबसाईट यांना केलेल्या प्रदानांचा आणि तसेच प्रचाराशी संबंधित कार्यात्मक खर्च, सृजनशील मजकूर विकसीत करण्यावर झालेला कार्यात्मक व्यवहार खर्च, वेतनांवरील व्यवहार खर्च आणि अशा उमेदवारांकडून आणि राजकीय त्यांची सामाजिक प्रसारमाध्यम खाते इत्यादी सांभाळण्याकरिता सेवा नियुक्त केलेल्या कार्यकर्त्यांच्या प्रदान केलेल्या मंजुरीचा देखील समावेश असेल.

जाहिरातीत काय टाळावे?

अशी जाहिरात जी देशाच्या कायद्याला धरून नाही, नैतिकता व सभ्यतेमध्ये क्षोभ निर्माण करते, जिच्या अवलोकनाने वेदना होतील किंवा जी धक्कादायक, उबक आणणारी, विद्रोहक असेल, धार्मिक भावना दुखावणाऱ्या किवा वंश, जात, वर्ण, पंथ व राष्ट्रीयत्त्वाचा उपहास करणाऱ्या, भारतीय संविधानाच्या कोणत्याही तरतुदीविरूद्ध आहे व गुन्हा करण्यास, शांतताभंग किंवा हिंसा करण्यास किंवा कायदाभंग करण्यासाठी लोकांना चिथावणी देऊन प्रवृत्त करणाऱ्या, हिंसेचा गौरव करणाऱ्या, कोणत्याही मार्गाने अलिता दाखवणाऱ्या कोणत्याही जाहिरातीला परवानगी देण्यात येणार नाही. विशिष्ट व्यक्तिच्या नावे बदनामी, न्यायालयाचा अवमान, अन्य देशांवर टीका करता येणार नाही.

कोणत्याही धार्मिक स्थळांचा वापर, धार्मिक मजकूर, बोधचिन्हे, घोषवाक्य यांचा वापर टाळावा.

संरक्षण विभागातील अधिकारी, व्यक्ती, (डिफेन्स पर्सनल) व त्यांचा सहभाग असलेल्या समारंभाचे फोटो टाळावेत. कोणाचेही खाजगी आयुष्य, अन्य पक्ष, त्यांचे कार्यकर्ते यांच्यावरील असत्यापित (ल्हनीग्षग्) टीकाटिपण्णी, विकृती यांचा समावेश टाळावा.

विवक्षित कार्यक्रमजाहिरातीच्या प्रक्षेपणामुळे धार्मिक, वांशिक, भाषिक, जातीय किंवा सामाजिक किंवा इतर कोणत्याही कारणावरून विविध वांशिक, भाषिक किंवा प्रादेशिक गटामध्ये, जातींमध्ये किंवा समाजांमध्ये अशांती, शत्रुत्त्व भाव, द्वेष किंवा तणाव निर्माण होण्याचा संभव असेल किंवा सार्वजनिक शांततेचा भंग होण्याचा संभव असेल तर लोकहिताच्या दृष्टीने अशी जाहिरात प्रसारित करण्यास मनाई आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या पत्रानुसार पूर्व प्रमाणिकरण न केलेली जाहिरात प्रसारीत केल्यास सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन न झाल्यास असा प्रकार न्यायालयाचा अवमान ठरेल. असा प्रकार आढळल्यास केबल टेलिव्हिजन नेटवर्कस् (रेग्युलेशन) ॲक्ट १९९५ नुसार निवडणूक निर्णय अधिकारी यांनी संबंधितास नियमांचे उल्लंघन थांबविण्याचे निर्देश द्यावेत. तसेच उपकरणे जप्त करण्याचीही तरतूद आहे.

**संकलन – संप्रदा बीडकर**

# जयक्रांती महाविद्यालयात 'ये दिवाली माय भारत वाली' उपक्रमास प्रारंभ

लातूर : येथील भारत शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि नेहरू युवा केंद्र, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने व युवाकार्य व क्रीडा मंत्रालय भारत सरकार क्षेत्रीय निदेशालय, पुणे येथील संचालक श्री. अजय शिंदे व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी सूचनेनुसार दिवाली विथ माय भारत – ये दिवाली माय भारत वाली या उपक्रमांतर्गत दिनांक २५ ऑक्टोबर ते ३० ऑक्टोबर, २०२४ या कालावधीमध्ये बाजार परिसर स्वच्छता, वाहतूक नियंत्रण अनुभवात्मक प्रशिक्षण व रुग्णालयातील सेवा से शीख आदि उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत स्वच्छता करण्यात आली व विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात आले. याशिवाय वाहतूक नियंत्रण व्यवस्थापनात शिवाजी चौक येथे वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. गणेश कदम व त्यांच्या टीमच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाहतूक व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक व प्रशिक्षण देण्यात आले.



तसेच वाहतुकीचे सर्व नियम त्यांना सांगण्यात आले. वाहतुकीचे आदेश देणारे चिन्ह, दिशा देणारे चिन्ह, सिग्नल संबंधी माहिती, त्याचबरोबर वाहन चालवत असताना नियमाचे पालन करण्याविषयी मार्गदर्शन केले. सीट बेल्ट, हेल्मेटचा वापर व वाहतूक नियम मोडल्यास असणारे दंड याविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. तसेच काही विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन. प्रत्यक्ष वाहतूक नियंत्रणाचे प्रात्यक्षिक वाहतूक नियंत्रकाच्या सोबत करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक डॉ. केशव आलगुले, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रमोद चव्हाण, नेहरू युवा केंद्र लातूरच्या जिल्हा युवा अधिकारी साक्षी सोमय्या, तसेच महाविद्यालयातील डॉ. राजेश्र्वर खाकरे,डॉ. राजाभाऊ पवार, डॉ. अविनाश पवार, श्री.प्रशांत साबणे याशिवाय विद्यार्थी खुणे सांची, विभुते अनिकेत, मोरे वैशाली, यांच्यासह एकूण ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

# तरुणाईंनी मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी जनजागृतीतून पुढाकार घ्यावा – जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे

लातूर : तरुणाई ही राष्ट्राची खरी संपत्ती आहे.तरुणाईंनी विधानसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढवा यासाठी समाजजीवनात जनजागृती करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.भारताचे सुजाण व सजग नागरिक म्हणून मतदानाचा हक्क बजावला पाहिजे.१८ वर्षे पूर्ण झालेल्या मुला–मुलींना मतदानाचा हक्क आहे.सुदृढ राष्ट्राच्या उभारण्यासाठी लोकशाहीच्या या उत्सवात उस्फूर्तपणे मतदान करून पोषक उमेदवार निवडला पाहिजे. विद्यार्थ्यांनी करिअर व भावी आयुष्य घडविण्यासाठी नवीन योजना,स्टार्टअप,कौशल्यवाढीच्या योजना यांचा लाभ घेतला पाहिजे.पुस्तकी ज्ञानाबरोबर मतदानासंदर्भातील दिव्यांगासाठीचे सक्षम प यासारखे विविध प,८५ वर्षापुढील वयोवृद्धांसाठी होम वोटिंगची सुविधा असे विविधांगी व्यावहारिक ज्ञान असले पाहिजे.मतदानाची टक्केवारी १०० टक्के होण्यासाठी युवा दूत म्हणून काम केले पाहिजे,असे प्रतिपादन लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी केले.



येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात दि.२५ आक्टोबर २०२४ रोजी जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी,लातूर आणि दयानंद शिक्षण संस्था,लातूर व माध्यमिक शिक्षण विभाग,लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने स्विप कार्यक्रमांतर्गत ' कॉफी विथ कलेक्टर ' मतदान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.यावेळी तृप्ती अंधारे(शिक्षणाधिकारी योजना, लातूर),नागेश मापारी(नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, लातूर ),दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे,दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, दयानंद कला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.दिलीप नागरगोजे,प्रा.बळवंत सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्रास्ताविकातून तृप्ती अंधारे यांनी संविधानाने दिलेल्या मतदानाचा हक्क जबाबदारीने बजवावा असे सांगितले तर आभार नागेश मापारी यांनी मानले.कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन प्रा.बळवंत सूर्यवंशी यांनी केले.यावेळी संदीपान जगदाळे व त्यांचे सहकारी यांनी मतदान जनजागृतीवर पोवाडा सादर केला.उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांच्यासोबत सर्वांनी मतदानाची शपथ घेतली.जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी विद्यार्थ्यांसोबत प्रश्र्न–उत्तर स्वरूपात युवा संवादही साधला.याप्रसंगी पर्यवेक्षक डॉ.संध्या वाडीकर,प्रा.विजयकुमार मांदळे यांच्यासह दयानंद शिक्षण संस्था अंतर्गत असलेल्या महाविद्यालयातील प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# 'लातूर ग्रामीण'च्या शाश्र्वत विकासाचा माझा प्रयत्न असाच सुरू राहील – धिरज देशमुख

लातूर/ प्रतिनिधी: लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचा शाश्र्वत विकासाचा माझा प्रयत्न यापुढेही असाच सुरू राहील. मतदारसंघातील सर्व मतदार, महाविकास आघाडीतील नेते, सहकारी, कार्यकर्ते यांचा विश्र्वास सार्थ ठरविण्यासाठी मी सदैव प्रयत्न करीत राहीन. यासाठी आपल्या सर्वांचे आशीर्वाद असेच माझ्या पाठीशी कायम राहतील, असा मला विश्र्वास आहे, अशा भावना लातूर ग्रामीण मतदारसंघातील काँग्रेस पक्षाचे उमेदवार आ. धिरज विलासराव देशमुख यांनी व्यक्त केल्या.

काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांची अधिकृत यादी गुरुवारी जाहीर झाली. या वेळी धिरज देशमुख माध्यमांशी बोलत असताना त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. धिरज देशमुख म्हणाले, अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने दुसऱ्यांदा लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाची उमेदवारी देवून माझ्यावर विश्र्वास दाखवल्याबद्दल काँग्रेसचे अध्यक्ष आदरणीय मल्लिकार्जुन खर्गे जी, माजी अध्यक्षा आदरणीय सोनिया गांधी,



लोकसभेतील विरोधी पक्षनेते आदरणीय राहुल गांधी, काँग्रेसच्या महासचिव आदरणीय प्रियंका गांधी तसेच, काँग्रेस पक्षाचे प्रभारी मा. रमेश चेन्नीथला जी, प्रदेशाध्यक्ष मा. नाना पटोले, माजी मंत्री मा. बाळासाहेब थोरात, माजी मंत्री मा. दिलीपराव देशमुख, माजी पालकमंत्री मा. अमित विलासराव देशमुख, निवडणूक समितीतील सर्व सन्माननीय सदस्यांचे, महाविकास आघाडीतील सर्व नेत्यांचे मी मनापासून आभार मानतो.

लातूर ग्रामीण मधील जनतेने आणि पक्ष नेतृत्वाने दाखवलेला हा विश्र्वास सार्थ ठरवण्याचा, जनसेवेचा वारसा पुढे नेण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न राहील. लातूर ग्रामीण मधील जनतेने नेहमीच मला मनापासून प्रेम दिले, आशिर्वाद दिला. यातून एक अतूट असं नाते निर्माण झाले आहे. लोकप्रतिनिधी म्हणून काम करत असताना जनतेनी जो विश्र्वास माझ्या प्रती दाखवला तो सार्थ ठरवत ग्रामीण भागातील विकासाला प्राधान्यं दिले. भविष्यात देखील याच पद्धतीने काम करण्यासाठी सर्वांचे सहकार्य व खंबीर अशी साथ लाभेल याची खात्री आहे, असे धिरज देशमुख यांनी सांगितले.

उमेदवारांच्या पहिल्या यादीत माझ्यासह इतरही उमेदवारांचे नाव जाहीर झाले आहे. सर्व सहकाऱ्यांचेही यानिमित्ताने मी हार्दिक अभिनंदन आणि विजयासाठी मनापासून शुभेच्छा, असेही ते म्हणाले.

# महायुती व महाविकास आघाडी सरकारच्या कामाचा तुलनात्मक लेखाजोखा मांडावा – आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांचे बूथप्रमुखांना आवाहन

देवणी/प्रतिनिधी : महाविकास आघाडी सरकारचा अडीच वर्षांचा भ्रष्ट कारभार आणि महायुती सरकारने शेतकरी,शेतमजूर,महिला, तरुण व सामान्य जनतेला केंद्रबिंदू मानून केलेल्या कामाचा तुलनात्मक लेखाजोखा बुथप्रमुखांनी जनतेसमोर मांडावा,असे आवाहन माजीमंत्री आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी बुथ प्रमुखांना केले.



निलंगा विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या प्रचारार्थ वलांडी येथे जिल्हा परिषद जवळगा गटाचा आणि देवणी येथील संगमेश्र्वर मंगल कार्यालयात देवणी शहर व बोरोळ जि.प.गटाचा विजय संकल्प बुथप्रमुख मेळावा संपन्न झाला. यावेळी मार्गदर्शन करताना आ.संभाजीराव पाटील निलंगेकर बोलत होते.वलांडी येथील मेळाव्यास भाजपाचे प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर,निलंगा संगायोचे अध्यक्ष शेषराव ममाळे,सभापती शिवकुमार चिंचनसुरे, नरसिंग बिरादार,जिल्हा संघटन सरचिटणीस संजय दोरवे,माजी जि.प. सदस्य प्रशांत पाटील, विधानसभा प्रभारी दगडू सोळुंके,देवणी तालुकाध्यक्ष काशिनाथ गरीबे,रामलिंग शेरे,हुडगे सावकार,बिराजदार मामा तर देवणी येथे मान्यवरांसह भगवानराव पाटील तळेगावकर, बाजार समिती सभापती शंकर पाटील तळेगावकर, नागेश जीवने,रमेश मन्सुरे,जेष्ठ कार्यकर्ते वैजनाथअप्पा अष्टुरे, शहराध्यक्ष अमर पाटील, अटल धनुरे,उपसभापती दिलीप मजगे,गोविंद म्हेत्रे, मन्सूर शेख,यशवंत पाटील,बाबुराव हिंगोले, नरसिंग सूर्यवंशी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. संभाजीराव पाटील निलंगेकर म्हणाले की,केंद्र आणि राज्यातील सरकारने सामाजिक एकोपा कायम ठेवण्यासाठी काम केले. राष्ट्रहिताची भावना जोपासणारी धोरणे आखली.दोन्ही सरकारांनी जनहिताच्या असंख्य योजना राबवल्या. महिलांसाठी राज्य सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली.एक रुपयात पीक विमा योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिलासा दिला.मतदारसंघात व जिल्ह्यात महामार्गांचे जाळे विणले.बुथ प्रमुखांनी या सर्व योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन त्यांनी केले.

विधानसभेची ही निवडणूक जय–पराजयासाठी नाही तर मतदारसंघाचा पाच वर्षांचा प्रपंच चालविण्यासाठी योग्य प्रतिनिधीची निवड करण्यासाठी आहे. आपल्याकडे विकासाची दिशा व दृष्टीही आहे. विरोधकांकडे विकासाचे मुद्दे नाहीत.ते केवळ अपप्रचार करत आहेत.या अपप्रचाराला बळी पडू नका,असे आवाहन त्यांनी केले.मागील २५ वर्षात प्रत्येकाच्या सुखदुःखात सहभागी झालो आहे.

जात–पात,धर्म न पाहता प्रत्येकाशी संपर्क ठेवला आहे.ही निवडणूक मतदारसंघाच्या भवितव्यासाठी असून योग्य विचार करून मतदान करावे,असे ते म्हणाले. सरकारने शेतकऱ्यांचे वीज बिल माफ केले. अतिवृष्टीचे अनुदान, मुलींसाठी मोफत शिक्षण, सोयाबीन अनुदान,पोलीस पाटलांचे मानधन,ग्राम रोजगार सेवकाचे मानधन,आशा सेविकांचे मानधन या संदर्भात निर्णय घेतले.मतदार संघातील प्रत्येक उंबरठ्याला मदत करण्यासाठी सरकारने काम केले असल्याचेही आ.निलंगेकर म्हणाले.

याप्रसंगी अरविंद पाटील निलंगेकर,संजय दोरवे,भगवानराव पाटील तळेगावकर यांचीही भाषणे झाली. देवणी येथील कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन मनोहर पटणे तर वलांडी येथील कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन प्रशांत पाटील यांनी केले.वलांडी व देवणी येथील बूथ प्रमुख मेळाव्यांना सर्व बूथ प्रमुख,पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवाब मलिकांचा पत्ता कट?

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने आज त्यांच्या उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली असून, यामध्ये ७ उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आलीय. वांद्रे पूर्व येथून झिशान सिद्दिकी यांना तर अणुशक्तीनगरमधून नवाब मलिक यांची कन्या सना मलिक यांना उमेदवारी देण्यात आलीय. राष्ट्रवादीच्या दुसऱ्या यादीतही नवाब मलिक यांचं नाव नसल्याने त्यांचा पत्ता कट झाल्याच्या चर्चा आहेत. परंतु अजित पवार यांनी या चर्चा तथ्यहीन असल्याचं सांगितलंय. तर सना मलिक यांनी वडील नवाब मलिक निवडणूक लढविणार असल्याचं सांगितलंय.अजित पवार गटाचे आतापर्यंत ४५ उमेदवार घोषित: राष्ट्रवादी अजित पवार गटाने आज त्यांच्या ७ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली असून, आतापर्यंत एकूण ४५ उमेदवारांची घोषणा करण्यात आलीय. वांद्रे पूर्व येथील काँग्रेसचे आमदार झिशान सिद्दिकी यांनी आज अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आणि लगेच त्यांना उमेदवारीसुद्धा देण्यात आली. झिशान सिद्दिकी यांची लढत शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे वरुण देसाई यांच्यासोबत होणार आहे. तसेच मुंबई अणुशक्तीनगरमधून नवाब मलिक यांच्या कन्या सना मलिक यांना उमेदवारी देण्यात आलीय. नवाब मलिक यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत. यावरून भाजपानेसुद्धा नवाब मलिक यांच्या नावाला आक्षेप घेतला होता. अशात दुसऱ्या यादीतही नवाब मलिक यांचं नाव नसल्याने नवाब मलिक यांचा पत्ता कट केला गेलाय, अशा चर्चा रंगल्या असताना अजित पवार यांनी मात्र या चर्चा तथ्यहीन असल्यास म्हटलं आहे. तर सना मलिक यांनी त्यांचे वडील नवाब मलिक निवडणूक लढवणार असल्याचे म्हटल्याने नवाब मलिक यांच्या उमेदवारीबाबतचा सस्पेन्स अद्याप कायम आहे.

